MHNS140003822012

**<u>नियमित दिवाणी दावा क्रं.५७/२०१२ मधील नि.क्र. ६३ वरील आदेश</u>**

वादीने प्रस्तुतचा अर्ज हा नियमित दिवाणी दावा क्र. ५७/२०१२ च्या दि.०१/०१/२०२४ रोजीचा दावा खारीज केल्याचा आदेश रद्द होवून दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठी झालेला उशिर माफ होवून मिळण्यासाठी दाखल केला आहे.

२. वादीने मुळ दावा विशेष दिवाणी दावा क्र २३४/२०११ असा नाशिक न्यायालयात दाखल केला होता. सदर दाव्यात प्रतिवादी क्र १ ते ४ यांनी प्रतिदावा दाखल केला होता. त्याप्रमाणे सदर दाव्याचे कामकाज दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर नाशिक यांच्याकडे प्रलंबित होते. दरमयानच्या काळात मा. उच्च न्यायालय मुंबई यांच्या परिपत्रकाप्रमाणे दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्या अधिकार क्षेत्रात वाढ होवून त्यांना रुपये पाच लाख पर्यंतचा दावा चालविण्याचे अधिकार देण्यात आले आहे. त्याप्रमाणे सदरचा दावा दिवाणी न्यायाधीश वरीष्ठ स्तर यांच्याकडून दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर दिंडोरी यांच्याकडे वर्ग करण्यात आला. मात्र, सदर दावा वर्ग केल्याबाबत कोणतीही माहित अथवा नोटीस वादी यांना देण्यात आली नाही. तसेच, वादी यांचे नाशिक येथील विधीज्ञांनी दिंडोरी येथे जाउन दाव्याची माहिती देणेबाबत असमर्थता दर्शवली व नवीन

वकिलांचा नेमणुक करण्याचा सल्ला दिला. वादी ही महिला असून ती नाशिक येथे राहते व एकटीला प्रवाशाच्या अडचणींमुळे सन २०२४ मध्ये तिने त्यांचे परिचित श्री संजय वाघचौरे यांना न्यायालयातील प्रलंबित दाव्याबाबत दिंडोरी येथे जावून चौकशी करण्याबाबत सांगितले त्यावेळी, त्यांना दाव्याबाबत सदर दावा नियमित दिवाणी दावा क्र.५७/२०१२ असा देण्यात आला असून त्याची पुढिल तारीख २९/११/२०२४ आहे असे सांगण्यात आले. त्याप्रमाणे त्यांनी दि.२२/११/२०२४ रोजी दाव्याच्या सर्व नकला मिळण्यासाठी न्यायालयात अर्ज केला. वादी यांना माहिती मिळाल्याप्रमाणे ते दि.२९/११/२०२४ रोजी न्यायालयात हजर झाले असता त्यांना प्रस्तुतचा दावा हा खारीज करण्याच्या आदेशावर असून शेवटीच संधी म्हणून दि.०३/१२/२०२४ अशी देण्यात आली आहे. वादी हे नाशिक येथील रहिवासी असल्याने त्यांचा दिंडोरी येथील वकिलांशी संपर्क साधुन नवीन वकिलपत्र देणे शक्य झाले नाही. दि.०३/१२/२०२४ रोजी वादी स्वतः न्यायालयात दाव्याच्या सुनावणीकामी हजर राहिले असता त्यांचा दावा खारीज करण्यात आले असल्याचे त्यांना कळाले.

**३.** वादींना संपुर्ण नकला या दि.०४/१२/२०२४ रोजी मिळाल्या. सदर नकला वादीचे वकिल यांना दाखवले असता दाव्यातील पक्षकार म्हणजे वादी व प्रतिवादी यांना दि.१९/०४/२०१२ व २६/०६/२०१२ समन्स काढण्यात आले होते. परंतु सदर नोटीसची बजावणी वादीवर झाली नव्हती. तसेच वादींना फेरनोटीस देखिल निघाली नव्हती. वादींचा दावा त्यांना नोटीस समन्सची बजावणी न होता

न्यायालयाने खारीज केल्याचे दिसून येते. वादीचा दावा पुन्हा फैलावर न घेतल्यास वादींचे कधीही भरुन न येणारे नुकसान होणार आहे. मात्र, सदर अर्ज दाखल करण्यास वादींना विलंब झाल्याने वादींनी प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे.

**४.** वेळोवेळी संधी देवूनही प्रतिवादींनी त्यांचा जबाब दाखल केला नाही. त्यांच्याविरुध्द प्रस्तुतचा अर्ज विनाजबाब चालविण्यात आला. वादीच्या वकिलांनी लेखी युक्तीवाद दाखल केला. तसेच त्यांनी ***मा. सर्वोच्च न्यायालयाचे व्दारिका प्रसाद वि.पृथ्वीराज सिंग, २०२४ गो जुरीस (एस सी)११२६*** हा न्यायनिवाडा दाखल केला.

**५.** वादीचा युक्तीवाद ऐकला व अभिलेखावर दाखल दस्तऐवजांचे अवलोकन केले. वादीने प्रस्तुतचा दावा खरेदी खत करुन मिळण्यासाठी व ठरावासाठी दाखल केला आहे. दाव्याचे स्वरुप पाहता व वस्तुस्थिती पाहता प्रस्तुतचा दावा पुन्हा फैलावर घेवून गुणवत्तेवर निकाल देणे नैसर्गिक न्यायतत्वाला धरुन आहे. तसेच, प्रस्तुतचा दावा पुन्हा फैलावर घेण्यास झालेला विलंब माफ केल्या प्रतिवादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट, न्यायालयास न्यायपूर्ण निकाल देणे शक्य होईल्. मात्र, दावा पुन्हा फैलावर घेण्यासाठी वादीस झालेला विलंब दुर्लक्षित करुन चालणार नाही, त्यासाठी वादीस कॉस्ट करणे न्यायोचित ठरेल. करीता मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करते.

**आ दे श**

१. प्रस्तुत अर्ज रक्कम रुपये १०००/- ची कॉस्ट भरुन मंजूर करण्यात येतो.

२. सदर कॉस्टची रक्कम वादींनी तालुका विधी सेवा समिती दिंडोरी येथे जमा करावी .

PANDIT ASHWINI ANIL
Digitally signed by PANDIT ASHWINI ANIL
Date: 2026.01.13 17:15:12 +0530

दि. १३/०१/२०२६ (ए. ए. पंडित)
दिंडोरी. सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर, दिंडोरी.
(MH03260)